# ऋणनिर्देश

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत देशात निःस्वार्थी आणि सेवाभावी वृत्तीने राष्ट्राच्या नवनिर्माणासाठी ज्या अनेक व्यक्तींचा उदय झाला, त्यांत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी शक्तिशाली भारतनिर्मितीसाठी निःस्वार्थ आणि सेवाभावी वृत्तीने योगदान दिले आहे. त्यावर निश्चितच संशोधन व्हावे असा ठाम आत्मविश्वास माझ्या मनी निर्माण झाला. कारण एक सामान्य फाटका-तुटका कार्यकर्ता ज्याच्याकडे कुठलीही धनदौलत नाही, जो मंदिरातील आठ फुट बाय दहा फुटांच्या खोलीत राहतो आणि ध्येयाने प्रेरित होऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर विकासाचे मार्ग कृतीतून स्पष्ट करुन दाखवतो, याची नोंद संशोधनातून व्हावी अशी मनस्वी इच्छा होती. ती इच्छा मी माझे मार्गदर्शक तथा गुरुवर्य डॉ. संभाजी रा. वारंगुळे पाटील सरांकडे व्यक्त केली. सरांनी माझा वैचारिक कल आणि इच्छा जाणून घेऊन मला 'अण्णा हजारे गांधीवादी नेतृत्त्व' या संशोधन प्रकल्पावर मार्गदर्शन करण्यास संमती दर्शविली. त्याच बरोबर त्यांनी मला महात्मा गांधी आणि ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे जीवनचरित्र आणि कृतिकार्यावरील वेगवेगळया ग्रंथांच्या अध्ययनाचा मार्गदर्शनपर सल्ला देऊन संशोधनास वेळोवेळी प्रोत्साहन दिले. हे सातत्याने घडणारे डॉ. संभाजी रा. वारंगुळे पाटील सरांचे मार्गदर्शन संशोधनास उपयुक्त ठरले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच माझे हे संशोधनकार्य पूर्णत्वास गेले. हे विशेषत्वाने या ठिकाणी मी नोंदवितो. याबद्दल मी माझे मार्गदर्शक तथा

गुरुवर्य डॉ. संभाजी रा. वारंगुळे पाटील सरांचे शाब्दिक आभार व्यक्त न करता त्यांच्या ऋणात राहणे पसंत करतो आणि त्यांच्याप्रति असणारी कृतज्ञता मी विनम्रतापूर्वक व्यक्त करतो.

स्वामी विवेकानंदांच्या विचारातून समाजसेवेची प्रेरणा घेऊन गांधीवादी मार्गांनी समाजाला विकासाच्या वाटेवर नेणारे, सामाजिक आणि राजकीय कार्यातून तळागाळातल्या माणसाला सोबत घेऊन, भ्रष्टाचारमुक्त भव्य भारताचे दिव्य स्वप्न साकार करण्यासाठी आत्मक्लेशातून हृदयपरिवर्तन आणि हृदयपरिवर्तनातून उन्नती घडवून आणणारे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी त्यांनी केलेल्या विकासात्मक कार्यावर संशोधन करण्यास मला मुखसंमती दिली आणि सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांच्याही ऋणात राहणे पसंत करीन. तसेच भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाचे कर्मचारी श्री. अनिल शर्मा व त्यांचे सर्व सहकारी यांनीदेखील मला वेळोवेळी संशोधनासाठी आवश्यक साहित्य पुरविले; तसेच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या एकूण सर्वांगीण कार्याबद्दल माहिती पुरविली. त्याबद्दल त्यांचेही ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

आम्हा प्राध्यापक मंडळींना संशोधनाचे महत्त्व पटवून देऊन संशोधनकार्यास प्रेरणा देणारे व त्यासाठी सहकार्य करणारे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. विठ्ठलराव लहाने, सरचिटणीस मा. श्री. मधुकरराव मुळे तसेच र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या स्थानिक नियामक मंडळाचे अध्यक्ष मा. ॲड. श्रीहरी मोटे व सर्व स्थानिक नियामक मंडळाचे

सन्माननीय सदस्य यांनीदेखील सहकार्य केले, त्याबद्दल त्यांचेही ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

ज्या अंकुशनगर वसाहतीमध्ये मी अनेक वर्षे राहिलो, सुखात वाढलो त्या नगराला रचविणारे; ज्या मत्स्योदरी शिक्षण संस्थेने मला आकाशात उंच भरारी घेण्यासाठी माझ्या वैचारिक आणि बौध्दिक पंखांना बळ दिले त्या मत्स्योदरी शिक्षण संस्थेची स्थापना करणारे; महाराष्ट्राच्या राजकारणात ज्यांच्याकडे आदर्श म्हणून बघितले जाते असे माजी खासदार आदरणीय ॲड. अंकुशराव टोपे साहेब; तसेच महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. राजेश भैय्या टोपे साहेब यांचे सदैव सहकार्य व शुभाशीर्वाद माझ्या व माझ्या परिवाराच्या पाठीशी असतात. त्यामुळे आयुष्यभर त्यांच्या ऋणात राहणे मी पसंत करीन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील माझे गुरुवर्य डॉ. एस. एन. दाते, डॉ. के. वाय. दौड, डॉ. श्रीराम निकम, डॉ. बी. एस. वाघमारे, डॉ. आफाक खान यांनी राज्यशास्त्र विभागात शिक्षण घेत असताना मला संशोधनाचे महत्त्व व गरज यांचे धडे वारंवार दिले व संशोधनास प्रेरित केले; त्याबद्दल त्यांचेही आभार मी व्यक्त करतो.

र. भ. अट्टल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. मुंढे तसेच महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. वसंतराव सानप, उपप्राचार्या डॉ. रजनी शिखरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. पी. सांगळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. डी. जरांगे यांनीदेखील वेळोवेळी माझ्या संशोधन

कार्याबद्दल चौकशी करुन मदत केली; त्याबद्दल त्यांचेही या ठिकाणी ऋण व्यक्त करतो; तसेच संशोधनातील वेगवेगळ्या मुद्यांवर माझ्याशी दिशादर्शक चर्चा घडवून आणणारे माझे सहकारी मित्र डॉ. एस. ई. घुमटकर यांनीही मला मदत केली. याबद्दल त्यांच्या सहकार्याप्रति त्यांचे आभार व्यक्त करतो. तसेच माझे सहकारी मित्र प्रा. बी. एस. मनाळ, डॉ. ए. एम. बुद्रुककर, महाविद्यालयातील माझे सहकारी प्रा. बी. बी. फलके, प्रा. एस. व्ही. लोंढे एस. ए. निकम, एस. के. निकम यांनी देखील मला संशोधनकार्यात सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचेही आभार मी व्यक्त करतो.

संशोधनासाठी मला प्रेरणा देणारे व ते पूर्ण करण्यासाठी मला सदैव जाणीव करुन देणारे डॉ. बळीराम कटारे व मला माझ्या संशोधनकार्यात वेळोवेळी मदत करणारे डॉ. मनोहर सिरसाट यांचेही ऋण मी शब्दरुपाने व्यक्त करतो.

ज्यांची मैत्री मला शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरली व जे बालपणापासून आजपर्यंत सदैव माझ्या सुखदु:खात सहभागी होतात, ते माझे वर्गमित्र तथा परमस्नेही प्रा. विष्णू उगले, धनंजय नाईक, सत्यकुमार डावकर, किशोर मरकड, प्रा. सिध्देश्वर मुंढे, प्रा. विकास आडे, यांच्याबद्दलची माझी मैत्रभावना आणि त्यांच्या प्रती असणारा माझा स्नेहभाव मला त्यांचे माझ्यावरील ऋण व्यक्त केल्याशिवाय शांत बसू देत नाही.

अपार कष्ट करुन आणि दु:ख सोसून आम्हा भावंडांना कष्टापासून आणि दू:खापासून दुर ठेवण्यासाठी सदैव धडपडणारे, आपल्या जगण्यातून सर्व कुटुंबीयांना

आत्मसन्मान व मूल्यदृष्टी देणारे, मला शिक्षणासाठी नियमित प्रेरणा देणारे माझे वडील श्री. नामदेवराव सटाले, तसेच माझ्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटातून माझी मुक्तता व्हावी यासाठी देवाकडे साकडे घालणारी तसेच संकटकाळी खंबीरपणे माझ्या पाठीशी उभी राहून मला धैर्य देणारी, माझ्या प्रत्येक शुभकार्यात मला प्रेरणा देणारी माझी आई सौ. आशाबाई सटाले या दोघांच्या आशीर्वादामुळेच माझे संशोधनकार्य पूर्णत्वास गेले त्यामुळे मी माझी आई आणि वडील (नाना) यांचा आजन्म ऋणी आहे. तसेच धाकटे बंधू संदीप सटाले व भावजय सौ. शीतल सटाले, बहीण सौ. अर्चना हेंद्रे व भावजी नितीन हेंद्रे, धाकटी बहीण सौ. प्रियंका कटारे व धाकटे भावजी सचिन कटारे यांनी वेळोवेळी संशोधन काळात माझे मनोबल उंचावले; त्याचबरोबर जिने प्रापंचिक व्यापातून मोकळीक देऊन कर्तव्यपूर्ती केली आणि मला मानसिक बळ दिले, ती माझी अर्धांगिनी सौ. सारिका आणि माझे थोरले चिरंजीव पार्थराज आणि धाकटे चिरंजीव सार्थक, पुतणी समृध्दी यांनी माझ्या संशोधन कार्यात कुठलाही व्यत्यय येऊ दिला नाही; त्यामुळे या सर्व माझ्या कुटुंबीयांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो. कमी वेळेत सुबक टंकलेखन करुन देणारे आमचे मित्र पोपट द. सातपुते (सर), तसेच प्रबंध लेखनाचे सुयोग्य मुद्रितशोधन करणारे अरुण पळटणीकर यांचेही आभार या ठिकाणी मी व्यक्त करतो. याशिवाय अनेकांचे सहकार्य मला या संशोधन कार्यासाठी मिळाले, त्यांचा नामोल्लेख करणे आवश्यक असतानाही जागेच्या मर्यादेमुळे ते शक्य नाही त्या सर्वांचेसुध्दा मी मनापासून आभार व्यक्त करतो.